मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदारांनो सावधान! जप्ती कारवाई सुरू!

## पिंपरी-चिंचवड शहरात व्यापक मोहीम राबवणार




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून २१ जानेवारी २०२६ पासून ही मोहिम शहरभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी विभागातील सर्व सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना थकबाकीदारांवर कोणतीही सूट न देता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या बैठकीस शहरातील १८ विभागीय कार्यालयांतील सहाय्यक मंडल अधिकारी उपस्थित होते.

मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी विभागनिहाय स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, येत्या काही दिवसांत थकबाकीदारांना जप्ती अधिपत्रे बजावण्यात येणार आहेत. अधिपत्र बजावल्यानंतरही जर संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्तांवर प्रत्यक्ष जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या मोहिमेंतर्गत निवासी थकबाकीदारांची नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर थेट जप्ती अशी कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून जप्तीची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

**३५ मालमत्ता जप्त तर १३३ नळ कनेक्शन खंडित...**

पिंपरी चिंचवड महापालिकेने कर संकलन मोहिमेला गती दिली असून, या कारवाईसाठी १८ विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील निवासी व बिगरनिवासी थकबाकीदारांवर कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील ३५ मालमत्तांची जप्ती करण्यात आली असून, १३३ थकबाकी मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहे.

### थकबाकीदारांची यादी केली जाणार प्रसिद्ध

» ज्या थकबाकीदारांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशा सर्व थकबाकीदारांची यादी महापालिकेमार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे. ही यादी प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित थकबाकीदारांकडून याबाबत करण्यात येणारी कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांनी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी तात्काळ थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकासासाठी मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत आहे. या कराच्या माध्यमातून शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा व शिक्षण व्यवस्था सक्षमपणे राबवली जाते. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर नियमान्वये कारवाई करण्यात येईल.
>
> – तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# 77 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची 1 कोटींची सायबर फसवणूक

## ‘डिजिटल अटक’ची भीती दाखवून लूट : पिंपरी-चिंचवड पोलिसांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात सायबर गुन्हेगारांनी सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून ७७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ‘डिजिटल अटक’ची भीती दाखवून आरोपींनी ही रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

चिंचवड येथील शिवाजी पार्क परिसरात राहणारे अशोक कृष्णा सराफ (वय ७७) यांना काही अज्ञात व्यक्तींनी फोन केला. फोनवरून आरोपींनी स्वतःची ओळख प्रथम टेलिफोन विभागाचे अधिकारी, नंतर सर्व्हिलन्स अधिकारी आणि अखेरीस सीबीआय अधिकारी अशी करून दिली. त्यांनी सराफ यांना सांगितले की, त्यांच्या नावावरील कॅनरा बँकेच्या खात्याचा वापर नरेश गोयल यांच्यावरील ईडी



कारवाईतील मनी लाँड्रिंग प्रकरणात झाला आहे.

या प्रकरणात तात्काळ अटक होऊ शकते, अशी भीती दाखवून आरोपींनी सराफ यांचे मानसिक खच्चीकरण केले. तसेच बँक खात्यातील आणि म्युच्युअल फंडातील रकमेची ‘लिगॅलिटी तपासणी’ करायची असल्याचे सांगत, सर्व पैसे ठराविक बँक खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. तपासणी पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण रक्कम परत दिली जाईल, असे आश्वासनही देण्यात आले. आरोपींच्या सांगण्यानुसार सराफ यांनी टप्प्याटप्प्याने सुमारे १ कोटी रुपये विविध खात्यांमध्ये ट्रान्सफर केले. मात्र, रक्कम पाठवल्यानंतर कोणताही संपर्क न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

**पोलिसांचे आवाहन...**

या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी भा.न्या.सं. (BNS) कलम २०५, ३०८(१), ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(सी) आणि ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. संबंधित मोबाईल क्रमांक आणि बँक खात्यांच्या आधारे तपास सुरू असून पोलीस निरीक्षक नाळे पुढील तपास करत आहेत.

# चिंचवडमध्ये भाजपाला ‘क्रॉस व्होटिंग’चा फटका!

## पक्षांतर्गत कुरघोड्या: राष्ट्रवादीच्या उमेदवारांना अनपेक्षीत विजय





**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड प्रभाग क्रमांक १८ च्या आखाड्यातील दोन गटात भाजप, राष्ट्रवादी अशी दुरंगी, तर उर्वरित दोन गटात तिरंगी लढत झाली. क-ड गटामध्ये काटे की टक्कर झाली. त्यात भाजपच्या माजी महापौर अपर्णा डोके, मनीषा चिंचवडे, सुरेश भोईर आणि राष्ट्रवादी (अजित पवार)चे अनंत कोन्हाळे विजयी झाले. या प्रभागात क्रॉस व्होटिंग, गटबाजी, मतविभागणीचा फटका भाजपला बसला.

उमेदवारीच्या दिवशी राष्ट्रवादीच्या डोके यांनी भाजपमध्ये आणि कोन्हाळे राष्ट्रवादीत आले. विद्यमान नगरसेवक राजेंद्र गावडे यांना डावलल्याने अपक्ष म्हणून रिंगणात उतरले. ‘अ’, ‘ब’ गटामध्ये दुरंगी, ‘क’ आणि ‘ड’ गटात तिरंगी लढत झाली.

‘अ’ गटातून अपर्णा डोके यांनी १९,०३३ यांनी पूजा आगज्ञान यांचा ९,५६३ मतांनी पराभव केला. आगज्ञान यांना ९,७४० मते मिळाली. डोके चौथ्यांदा नगरसेविका झाल्या. ‘ब’ गटात भाजपच्या मनीषा चिंचवडे १७,०७९ यांनी राष्ट्रवादीच्या ज्योती निंबाळकर यांचा ९,८२२ मतांनी पराभव केला. निंबाळकर यांना ७,२५७ मते मिळाली. उद्धवसेनेच्या रफिया इम्रान पानसरे यांनी २२५८ तिसऱ्या क्रमांकाची मते घेतली, तर ‘क’ गटात भाजपचे ॲड. मोरेश्वर शेडगे, कोन्हाळे, राष्ट्रवादी (शप) गटाचे सागर चिंचवडे अशी तिरंगी लढत झाली. त्यात कोन्हाळे यांनी १४,५०४ मते घेऊन शेडगे २७०२ मतांनी पराभव केला. शेडगे यांनी ११,८०२ मते घेतली. तर ‘ड’ गटात भाजपचे सुरेश भोईर, अश्विनी चिंचवडे, अपक्ष राजेंद्र गावडे अशी तिरंगी लढत झाली. त्यात भोईर यांनी ११,४७२ मते घेऊन गावडे यांचा १,२४४ मतांनी पराभव केला. अपक्ष असतानाही गावडे यांनी १०,२२८ मते घेतली. राष्ट्रवादीच्या चिंचवडे यांना ७,१२९ तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली.

### क्रॉस व्होटिंगमुळे राष्ट्रवादीला फायदा...

» गतवेळी भाजपाला दोन, राष्ट्रवादीला एक, उद्धवसेनेला एक जागा मिळाल्या होत्या. अश्विनी चिंचवडे, राजेंद्र गावडे याचे तिकीट कापले तरीही गावडे यांनी अपक्ष लढून ताकद दाखवून दिली. भाजपने तीन जागांवर यश मिळविले असले तरी पॅनलप्रमुख शेडगे यांना पराभवाचा सामना करावा लागला. विधानसभा, शहराध्यक्ष निवडीवेळी झालेली भाजप नेत्यांतील गटबाजी आणि क्रॉस व्होटिंगचा फटका त्यांना बसला.

# विविध राज्यातील माध्यमकर्मींना “वेस्ट टू एनर्जी” ची भुरळ!

## प्रकल्प अभ्यास दौरा : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कामाचे केले कौतूक




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाश्वत घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छ ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील कार्यपद्धतींचा अभ्यास करण्यासाठी विविध राज्यांतील पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मोशी येथील कचऱ्यापासून वीजनिर्मिती (WASTE-TO-ENERGY) प्रकल्पाला भेट दिली. या भेटीदरम्यान महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनाची संपूर्ण साखळी, तांत्रिक प्रक्रिया व त्यातून होणारे पर्यावरणीय लाभ यांची सविस्तर माहिती त्यांनी घेतली.

या अभ्यास भेटीदरम्यान महानगरपालिकेच्या वतीने जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सर्व पत्रकारांचे स्वागत केले. यावेळी उप अभियंता प्रदीप धेंडे यांच्यासह पंजाबमधील पंजाबी जागरणच्या तेजींदर कौर, पंजाब केसरी ग्रुपच्या वंदना, हिमाचल प्रदेशमधून हिमाचल दस्तकच्या आशा भारद्वाज, दैनिक भास्करच्या आंचल चौहान, चंदीगढमधून दैनिक ट्रीब्युनच्या कविता राज, हिंदुस्थान टाईम्सच्या अनिशा सरीन, द संडे गार्डियनच्या तरूनी गांधी, पीटीआय टीव्हीच्या नेहा शर्मा, अर्थ प्रकाशचे रंजू ऐरी, चंदीगढ पत्र सूचना कार्यालयाच्या संचालिक सपना, कार्यालय सहाय्यक सुनिता मोझा तसेच मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्या विकेंद्रित कचरा व्यवस्थापन मॉडेलमुळे शहरातील सर्व ३२ प्रभागांमध्ये १०० टक्के ओला व सुका कचरा वेगळा करून दारोदारी संकलन करण्यात येत असून, ५०४ जीपीएस सुसज्ज वाहनांद्वारे एकात्मिक आदेश व नियंत्रण केंद्रातून रिअल टाइम देखरेख केली जाते. नागरिकांमध्ये कचरा विभाजनाची सवय निर्माण करण्यासाठी जनजागृती पथके कार्यरत असून, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईही केली जाते.

### 1440 टन कचऱ्यावर नियमित प्रक्रिया...

» पत्रकारांना उप अभियंता प्रदीप धेंडे यांनी माहिती देताना सांगितले की, शहरातून दररोज गोळा होणारा सुमारे १,४४० टन कचरा विविध प्रकल्पांद्वारे पुनर्वापर व ऊर्जा निर्मितीसाठी वापरण्यात येतो. मोशी येथील ७०० टन प्रतिदिन क्षमतेच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पात आतापर्यंत २ लाख टनांहून अधिक सुका कचरा प्रक्रिया करून १४.५५ कोटी युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय ५०० टन प्रतिदिन क्षमतेचा कंपोस्ट प्रकल्प, ५० टन प्रतिदिन हॉटेल कचऱ्यावर आधारित बायोगॅस प्रकल्प आणि १,००० टन प्रतिदिन क्षमतेची मटेरियल रिकव्हरी सुविधा कार्यरत आहे.

प्रकल्प अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक...

प्लास्टिक-टू-फ्युएल प्रकल्प, बांधकाम व राडारोडा पुनर्वापर युनिट्स, मॅग्नेटिक प्लाझ्मा तंत्रज्ञानाद्वारे धोकादायक कचऱ्याची प्रक्रिया, ई-कचरा केंद्रातून दुरुस्त केलेले लॅपटॉप महापालिका शाळांना देणे तसेच लेगेसी वेस्ट बायो-मायनिंगद्वारे १० लाख घन मीटरपेक्षा अधिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या भेटीदरम्यान मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दूरध्वनीद्वारे पत्रकारांशी संवाद साधून वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची तांत्रिक बाजू, कार्यक्षमता, पर्यावरणीय परिणाम तसेच पत्रकारांनी उपस्थित केलेल्या शंका व प्रश्नांचे सविस्तर निरसन केले. या अभ्यास भेटीमुळे पिंपरी चिंचवड महापालिकेचे शाश्वत कचरा व्यवस्थापन मॉडेल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे पत्रकारांनी नमूद केले.

# शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट भाजपच्या पथ्यावर

## महापालिका निवडणुकीच्या एकूण मतदानात 43.10 टक्के मतदान एकट्या भाजपला झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीचा थेट फायदा महापालिका निवडणुकीत भाजपला झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहेत. महापालिका निवडणुकीच्या एकूण मतदानात ४३.१० टक्के मतदान एकट्या भाजपला झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला २३.९९, काँग्रेसला ८.४८, शिवसेना ६.९९, तर शिवसेनेला (ठाकरे) ४.२० टक्के मतदान झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला केवळ ३.८६ टक्के मतदान झाले आहे.

महापालिकेकडून मतमोजणीनंतरची अंतिम आकडेवारी निश्चित करण्यात आली आहे. त्यातून ही माहिती समोर आली आहे.

शहरातील ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी गेल्या आठवड्यात मतदान झाले. त्यामध्ये अ, ब, क, ड अशा प्रत्येक जागेसाठी सुमारे ३५ लाख ५१ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला.

महापालिकेसाठी ५२ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला असून, मतदारांना प्रत्येकी ४ मते द्यायची होती. एकूण ७४ लाख ६३ हजार ८२४ मतदान झाले. त्यात ३२ लाख १८ हजार ६६४ मतदान (४३.१ टक्के) भाजपला झाले आहे. त्यामुळे भाजपचे सुमारे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत.

त्या खालोखाल सर्वाधिक १७ लाख ८६ हजार १७२ मतदान राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) झाले आहे. तिसऱ्या क्रमांकाची ६ लाख ३२ हजार ९२४ मते काँग्रेसला मिळाली आहेत. शिवसेनेला ५ लाख २२ हजार १३८ मते मिळाली असून, शिवसेना (ठाकरे) पक्षाला ३ लाख ११ हजार ६६९ मते मिळाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला २ लाख ८८ हजार २०० मते मिळाली आहेत. उर्वरित मतांमध्ये इतर प्रमुख राजकीय पक्ष, अपक्ष, तसेच नोटाला मिळालेल्या मतांचा समावेश आहे.

दरम्यान, अनेक प्रभागांत शिवसेना आणि राष्ट्रवादीचे बाहेर पडलेले गट एकमेकांच्या समोर लढल्याने या दोघांचेही नुकसान झाले आहे. या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्या असल्या, तरी दोन्ही पक्षांनी घड्याळ आणि तुतारी चिन्ह घेतल्याने मतदारांमध्ये गोंधळ झाला. एकसंध असताना २०१७ राष्ट्रवादीला ३८ जागा मिळाल्या होत्या. आता एकत्र लढूनही केवळ ३० जागा मिळाल्या आहेत. शिवसेना एकत्र असताना १० जागा आल्या होत्या, तर आता केवळ १ जागा आली आहे.




### महाविकास आघाडीलाही फटका

» राज्यात महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेस (पवार) पक्ष बाहेर पडल्याने शहरात सुमारे ४० ते ४५ जागांवर महाविकास आघाडीला फटका बसला आहे. महाविकास आघाडी म्हणून दोन्ही राष्ट्रवादी, मनसे, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस एकत्र लढले असते, तर त्यांना मिळालेली मते पाहता या मतांची एकत्र टक्केवारी सुमारे ४२ टक्के होते. त्यामुळे या पक्षांना भाजपला रोखणे शक्य झाले असते.

### तीन प्रमुख पक्षांपेक्षा 'नोटा' अधिक

» या निवडणुकीत निवडणूक लढविणाऱ्या काही मोठ्या राजकीय पक्षांपेक्षाही 'नोटा'ला अधिक मतदान झाले आहे. पुण्यात 'नोटा'ला एकूण २ लाख २१ हजार २०९ मतदान झाले आहे, तर सर्व अपक्ष उमेदवारांना १ लाख ४७ हजार २७८ मतदान झाले आहे. मनसेला झालेले मतदानही 'नोटा'पेक्षा कमी असून, ते १ लाख ५५ हजार ७८८ आहे. 'आप'ला ५० हजार ५७१, बसपाला ३२ हजार ६७ आणि वंचित बहुजन आघाडीला ७९ हजार ८९२ मतदान झाले आहे. दोन्ही शिवसेनेला पडलेली मते एकत्र केल्यास त्यांची एकूण मतदान ८ लाख ३४ हजारांवर १ टक्क्यांवर जाते, तर दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र असते, तर त्यांचे मतदान २० लाखांच्या पुढे म्हणजेच जवळपास २७ टक्क्यांवर जात असल्याने या दोन्ही पक्षातील फुटीचा फायदा भजाप उमेदवारांना झाल्याचे स्पष्ट होत आहे.

### मतदारांमध्ये गोंधळ झाला

» दरम्यान, अनेक प्रभागांत शिवसेना आणि राष्ट्रवादीचे बाहेर पडलेले गट एकमेकांच्या समोर लढल्याने या दोघांचेही नुकसान झाले आहे. या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्या असल्या, तरी दोन्ही पक्षांनी घड्याळ आणि तुतारी चिन्ह घेतल्याने मतदारांमध्ये गोंधळ झाला. एकसंध असताना २०१७ राष्ट्रवादीला ३८ जागा मिळाल्या होत्या. आता एकत्र लढूनही केवळ ३० जागा मिळाल्या आहेत. शिवसेना एकत्र असताना १० जागा आल्या होत्या, तर आता केवळ १ जागा आली आहे.

# आता घरबसल्या लायसन्स आणि नूतनीकरण.. फक्त 'आधार'चा मोबाईल जोडावा...

## सुविधांचा लाभ घरबसल्या घेण्यासाठी परिवहन विभागाने 'आधार कार्ड' वरील मोबाईल क्रमांक जोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वाहनचालकांना शिकाऊ परवाना, परवाना नूतनीकरण, आकर्षक क्रमांक किंवा वाहनासंबंधी इतर सुविधांचा लाभ घरबसल्या घेण्यासाठी परिवहन विभागाने 'आधार कार्ड' वरील मोबाईल क्रमांक जोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जुने मोबाईल क्रमांक अद्ययावत करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सुरुवात केली आहे.

या बाबत परिपत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) कार्यवाही करण्यास सुरुवात केली आहे. शिकाऊ परवाना, त्यानंतरचा वाहन चालविण्याचा परवाना, दुबार (डुप्लिकेट) परवाना, परवान्याचे नूतनीकरण आणि अर्जाची स्थिती तपासणे यांसारख्या विविध सुविधांसाठी नागरिकांना स्थानिक 'आरटीओ'मध्ये जावे लागते. मात्र, परिवहन विभागाने 'फेसलेस' सुविधा सुरू केली आहे. त्यासाठी सारथी ४.० ही प्रणाली विकसित केली आहे.




मात्र, या सुविधेचा लाभ घेताना अनेक वाहनधारकांच्या नावांमध्ये बदल, मोबाईल क्रमांक बदललेले किंवा सुरू नसल्याने अडचणींना सामोरे जावे लागत असून, आरटीओमध्ये फेऱ्या माराव्याच लागत असल्याचे चित्र आहे.

'सारथी ४.०' या ऑनलाईन प्रणालीनुसार वाहन चालविण्याचा परवाना नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करताच 'एक वेळ गुप्त क्रमांक' (ओटीपी) मागितला जातो. मात्र, अनेक वाहनधारकांनी जुन्या काळात वाहन परवाने काढले आहेत. जवळपास ८० टक्क्यांहून अधिक वाहनधारकांच्या परवान्यावरील माहिती आणि मोबाईल क्रमांकामध्ये सांधर्म्य आढळून आले आहे. अनेक वाहनचालकांनी २० वर्षांपूर्वी वाहन परवाने काढले आहेत. त्यामुळे नूतनीकरण करताना मोबाइल क्रमांकांची नोंद नसल्याने किंवा चालू नसलेला मोबाईल क्रमांक तिथे असल्याने पुढील प्रक्रिया होत नाही. यामुळे आता परिवहन विभागाने 'आधार कार्ड'वरील माहितीचा आधार घेऊन त्याला जोडलेला मोबाईल क्रमांक परिवहन विभागाच्या सेवांसाठी अद्ययावत करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित वाहनधारकांनी मोबाईक क्रमांक आधार कार्डवरील क्रमांकाप्रमाणे अद्ययावत करून घेण्याबाबत परिपत्रकाद्वारे नमूद केले आहे.

> "राज्य सरकार आणि परिवहन विभागाच्या निर्देशानुसार वाहन परवाना नूतनीकरण किंवा इतर सेवांचा लाभ घरबसल्या घेण्यासाठी आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल क्रमांक आणि पत्ता किंवा नावातील सांधर्म्य दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. मोबाईल क्रमांक बदलला असल्यास तातडीने दुरुस्ती करावी.
>
> **- स्वप्नील भोसले, प्रादेशिक परिवहन अधिकारी**

# माऊली खंडागळे यांचा उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र

## महाविकास आघाडीच्या बैठकीचे निमंत्रण न मिळाल्याने निर्माण झालेल्या नाराजीतून जुन्नर तालुक्यातील राजकारणात मोठा भूकंप झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या कार्यालयात सोमवारी (दि. १९) झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीचे निमंत्रण न मिळाल्याने निर्माण झालेल्या नाराजीतून जुन्नर तालुक्यातील राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जुन्नर तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. या घडामोडीमुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून निष्ठावंत शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

आमदार शरद सोनवणे यांच्या रायगड या निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीत माऊली खंडागळे यांसह उपतालुकाप्रमुख मोहन बांगर आणि मंगेश काकडे यांनी अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशानंतर आमदार सोनवणे यांनी माऊली खंडागळे यांच्या पत्नीला व मंगेश काकडे यांना जिल्हा परिषदेची उमेदवारी जाहीर केल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, अचानक झालेल्या या निर्णयामुळे गेले अनेक महिने मतदारसंघात प्रचार करणाऱ्या मूळ निष्ठावंत शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी असून, आपल्यावर अन्याय झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यावेळी बोलताना खंडागळे यांनी आरोप केला की, जुन्नर तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादी आणि ठाकरे गटाने एकत्र येऊन निवडणुका 'घड्याळ' चिन्हावर लढवण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो सामान्य शिवसैनिकांना मान्य नाही. शिवसेनेचे अस्तित्व मुळापासून नष्ट करून माझा राजकीय बळी देण्याचे हे मोठे षडयंत्र आहे. विधानसभा निवडणुकीत मशाल चिन्हासाठी जागा मिळणे अपेक्षित असताना ती जागा राष्ट्रवादीला सोडण्यात आली होती. आता जिल्हा परिषद निवडणुकीतही शिवसेनेच्या वाट्याला सन्मानजनक जागा न देता मित्रपक्षाकडून डावलले जात असल्याचे त्यांनी सांगितले. मशाल चिन्हाचे अस्तित्व संपवण्याचे काम आघाडीतील नेत्यांकडूनच होत असल्याचा घणाघातही त्यांनी केला.



### निष्ठावंत शिवसैनिक काय भूमिका घेणार?

» तालुक्यातील महायुती (भाजप व शिवसेना आणि महाआघाडी (दोन्ही राष्ट्रवादी व ठाकरे शिवसेना) यांच्यातील सामना आता अधिक रंगतदार झाला आहे. नाराज निष्ठावंत शिवसैनिक भविष्यात कोणती भूमिका घेतात आणि ते इतर पक्षांकडे वळतात का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. येत्या काही दिवसांत उमेदवारी अर्जांच्या प्रक्रियेनंतर तालुक्यातील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये संताप

» जुन्नर तालुक्यातील डिंगोरे, ओतूर, पिंपळवंडी, राजुरी, बोरी, नारायणगाव, सावरगाव आणि बारव या आठही जिल्हा परिषद गटांमध्ये शिवसेनेच्या निष्ठावंत उमेदवारांनी जोरदार तयारी सुरू केली होती. आता या नव्या पक्षप्रवेशांमुळे उमेदवारी मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. आगामी निवडणुकीत या आठही जागांवर विजय मिळवणे हे आमदार शरद सोनवणे यांच्यासाठी प्रतिष्ठेचे असले, तरी अंतर्गत नाराजी दूर करणे हे मोठे आव्हान ठरणार आहे.

### राष्ट्रवादीसोबत का लढायचे?

» जुन्नर तालुक्यातील बोरी-खोडद सारख्या गटात शिवसेनेचे स्वतंत्र अस्तित्व आणि ताकद असताना राष्ट्रवादीसोबत घड्याळ चिन्हावर का लढायचे, असा प्रश्न माऊली खंडागळे यांनी उपस्थित केला आहे. नारायणगाव-वारूळवाडी गटात उपसरपंच बाबू भाऊ पाटे यांनी आधीच शिंदे गटात प्रवेश केल्याने ठाकरे गटाची स्थिती कमकुवत झाली होती, आता खंडागळे यांच्या जाण्याने ठाकरे गटाचे अस्तित्व संकटात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे..

# दौंड तालुक्यात आमदार राहुल कुल-माजी आमदार रमेश थोरातांची अग्निपरीक्षा

## दौंड तालुक्यातील वातावरण देखील उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच चांगलेच तापले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या जिल्हाभर झेडपी पंचायत समितीचे वारे वेगाने वाहत आहेत. असेच दौंड तालुक्यातील वातावरण देखील उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच चांगलेच तापले आहे. फॉर्म भरण्याची दि. २१ ची शेवटची तारीख आहे. मात्र, अजूनही जिल्हा परिषदचे सात गट आणि पंचायत समितीचे १४ गणात उमेदवार अजूनही ठरले नाहीत. हालचाली जरी गतिमान झाल्या असल्या तरीदेखील उमेदवार फायनल करण्याची प्रक्रिया मात्र पूर्ण झाली नसल्यामुळे उमेदवार नक्की कोण याबाबत मोठी गोपनीयता कुल आणि थोरात गटाकडून पाळली गेली आहे.



यामध्ये ही निवडणूक हायहोल्टेज ठरणार असून संबंध जिल्ह्याचे लक्ष दौंड तालुक्याकडे लागले आहे. मात्र, उमेदवारांची बंडखोरी टाळण्यासाठी भाजपा आमदार राहुल कुल यांच्याकडून आणि राष्ट्रवादीचे माजी आमदार रमेश थोरात यांच्याकडून उमेदवारीबाबत पूर्णपणे गोपनीयता जरी राखली गेली असली तरी देखील राहुल कुल आणि रमेश थोरात यांच्यापुढे मात्र ही अग्निपरीक्षाच असल्याचे ज्येष्ठ नागरिक बोलत आहे.

भाजपकडून आमदार राहुल कुल यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेत बैठका घेतल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी आमदार रमेश थोरात यांनीदेखील इच्छुकांशी चर्चा केली आहे.मात्र, त्यानंतरही उमेदवारांची अधिकृत घोषणा झाली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे इच्छुकांची धाकधूक वाढली असून देव पाण्यात ठेवण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. तालुक्यात सात जिल्हा परिषद गटासाठी इच्छुक उमेदवारांची मोठी संख्या आहे.त्याचबरोबरीने चौदा पंचायत समिती गणासाठी देखील इच्छुक तेवढेच रांगेत असल्याचे पाहायला मिळत आहेत.

दरम्यान,काही राहू -खामगाव, पारगाव -केडगाव, बोरिपारधी – देऊळगाव गटांमध्ये उमेदवारी जवळपास निश्चित झाली असल्याचे बोलले जात आहे. तरी अजून अधिकृत घोषणा पक्षाने केलेली नाही. त्यामुळे कार्यकर्ते संभ्रमावस्थेत आहेत.

### केडगावमधून तुषार थोरात

» वरवंड-पारगाव गटातून भाजपकडून सारिका संजय दिवेकर, तर त्यांच्याविरोधात राष्ट्रवादीकडून गायत्री विशाल खळदकर या मैदानात आहेत. केडगाव-बोरीपार्धी गटात भाजपकडून अभिषेक आनंद थोरात यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी आमदार रमेश थोरात यांचे पुत्र तुषार रमेश थोरात यांची उमेदवारी निश्चित असल्याचे समजते आहे.